◆ ADVT ◆
येथे जाहिरात द्या
98700 06472 · need24.digital

NEED24 NEWS
हर ख़बर, हर शहर

नीड 24 न्यूज़

हर खबर, हर शहर

◆ ADVT ◆
येथे जाहिरात द्या
98700 06472 · need24.digital

DIGITAL E-PAPER

PRGI APPLICATION UNDER PROCESS
Application No. T/GJ/2026/0619/2304/1577

GST
GSTIN 24CINPG0564Q1ZT

UDYAM REGISTERED
UDYAM-GJ-14-0003714

◆ DIGITAL NEWS NETWORK ◆
भारताचे विश्वासार्ह बहुभाषिक डिजिटल न्यूज नेटवर्क
11+ Languages | 24×7 Live | e-Paper Daily

आमचे App डाउनलोड करा
Download on the App Store
GET IT ON Google Play

www.need24.digital
info@need24.in
+91 98700 06472
FOLLOW US:

तेज़ | सटीक | निष्पक्ष | जनहित में | सच की आवाज़ | जन-जन की आवाज़ | निडर पत्रकारिता

शिक्षा

श्रीयांश संस्थेचे आवाहन: मोबाईलच्या पडद्यापेक्षा मुलांसाठी मैदान अधिक महत्त्वाचे



आज विकसित देशांमध्ये मुलांना लहान वयापासूनच खेळ, विज्ञान, संशोधन, कला आणि कौशल्य विकासासाठी प्रोत्साहन दिले जाते. यामुळे मुले शारीरिकदृष्ट्या सक्षम, मानसिकदृष्ट्या मजबूत आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यास तयार होतात. त्यामुळे खेळ हा शिक्षणाचा अविभाज्य भाग मानला जातो. मात्र, भारतात अपार प्रतिभा असूनही अनेक मुलांचा वाढता स्क्रीन टाइम आणि सोशल मीडियाकडे वाढलेले आकर्षण चिंतेचा विषय आहे. अनेक मुले रील्स तयार करण्यात किंवा सतत मोबाईल वापरण्यात वेळ घालवतात. तंत्रज्ञानाचा वापर उपयुक्त असला तरी तो शिक्षण, खेळ, आरोग्य आणि सर्वांगीण विकासाचा पर्याय ठरू नये, असे मत व्यक्त करण्यात आले आहे.

पालकांनी मुलांना फक्त मोबाईल देण्याऐवजी त्यांना मैदानावर खेळण्यासाठी, वाचनासाठी, सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये, विज्ञान प्रदर्शनांमध्ये आणि इतर सकारात्मक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. मुलांच्या आवडी जोपासताना त्यांचा शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकासही तितकाच महत्त्वाचा आहे. आज भारताला अधिकाधिक उत्कृष्ट खेळाडू, संशोधक, वैज्ञानिक आणि जबाबदार नागरिकांची गरज आहे. त्यासाठी प्रत्येक गावात खेळाची संस्कृती रुजवणे, क्रीडा सुविधा उपलब्ध करून देणे आणि मुलांना मैदानी खेळांकडे वळवणे ही काळाची गरज आहे.

श्रीयांश बहुउद्देशीय संस्था ग्रामीण भागातील मुलांमध्ये क्रीडा, शिक्षण, आरोग्य आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. संस्थेच्या संस्थापक व अध्यक्ष प्रशांत अशोक प्रधान यांनी आपल्या विधानात म्हटले आहे की, "आज मैदानावर घाम गाळणारी मुलेच उद्या देशासाठी पदके जिंकतील आणि राष्ट्राचा अभिमान वाढवतील." त्यांनी सर्वजणांना मुलांच्या हातात फक्त मोबाईल नव्हे, तर चेंडू, पुस्तक, बॅट, रॅकेट आणि उज्ज्वल भविष्याची स्वप्ने देण्याचे आवाहन केले आहे.

— Prashant Pradhan

स्थानीय

एकाच दिवशी दोन रेल्वे अपघात: डिगारु व कानपूरमध्ये गाड्या रुळावरून घसरल्या



आज भारतीय रेल्वेसाठी दुर्दैवी दिवस ठरला, डिगारु आणि कानपूर येथे दोन प्रवासी गाड्या रुळावरून घसरल्या, परंतु मोठी जीवितहानी टळली.

पहिला अपघात कोलकाता-सायरंग एक्सप्रेसच्या बाबतीत होता, जो सकाळी ६:५४ वाजता डिगारु जवळ, गुवाहाटीपासून ३० किमी अंतरावर रुळावरून घसरला. या घटनेत ५ डबे खाली पडले आणि अनेक प्रवासी जखमी झाले, ज्यामुळे या मार्गावरील इतर लांब पल्ल्याच्या गाड्यांची वाहतूक विस्कळीत झाली.

दुसरा अपघात चौरी चौरा एक्सप्रेस (ट्रेन क्र. १५००३) चा होता, जो दुपारी ५:३० वाजता कानपूर सेंट्रल स्टेशनच्या ७ नंबर प्लॅटफॉर्मवर पोहोचला. स्टेशन सोडताच अवघ्या २ मिनिटांत B-4 ते B-7 या ४ डब्यांनी रुळावरून घसरले, ज्यात जवळपास ३०० प्रवासी होते. सर्व प्रवासी सुरक्षित आहेत आणि रेल्वे अधिकारी तातडीने घटनास्थळी पोहोचून खराब झालेले डबे बाजूला काढून उरलेल्या डब्यांना इंजिन जोडून ट्रेन पुढे पाठवण्याची व्यवस्था करण्यात आली.

दोन्ही अपघातांमुळे दिल्लीच्या दिशेने जाणाऱ्या आणि या मार्गावरील इतर अनेक गाड्यांची वाहतूक काही काळासाठी विस्कळीत होऊ शकते. रेल्वे अधिकारी आणि इंजिनिअर तातडीने कार्यवाही करत आहेत.

या दुहेरी अपघातांनी प्रवाशांच्या सुरक्षिततेबद्दल चिंता वाढवली आहे आणि रेल्वे प्रवासाची सुरक्षितता पन्हा एकदा प्रश्नात आली आहे.

— DOCTOR PINTU PAUL

स्थानीय

वीज बंदीमुळे मामाला जाग आली, १७ वर्षीय भाची घरातून गायब दिसली



वीज अचानक बंद झाल्यामुळे घरातील एक वृद्ध व्यक्ती, ज्याला मामा म्हणून ओळखले जाते, जागा झाला. जागे होताच त्याने लक्षात घेतले की त्याची १७ वर्षीय भाची घरातून गायब आहे.

मामाने तत्काळ स्थानिक पोलीस ठाण्याला कळविले आणि गायब व्यक्तीच्या शोधासाठी ताबडतोब कारवाई सुरू झाली. पोलिस अधिकाऱ्यांनी परिसरातील शेजाऱ्यांशी संवाद साधला, घराची तपासणी केली आणि संभाव्य लपण्याच्या ठिकाणांची चौकशी सुरू केली.

शोधकार्यानंतर, काही तासांच्या आतच भाची सुरक्षितपणे सापडली आणि तिला कोणतीही शारीरिक इजा न होता पोलीस स्टेशनवर नेले गेले. पोलिसांनी घटनाक्रम नोंदवून पुढील तपास सुरू ठेवण्याचे कळविले.

— IMRAN BELIM, औरंगाबाद

ऊसाला पहिली उचल ३५०० रुपये मिळावी; राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी सोलापुरात भव्य मोर्चा



ऊसाला पहिली उचल ३५०० रुपये मिळावी; राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी सोलापुरात भव्य मोर्चा

सोलापूर : ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उसाची पहिली उचल प्रतिटन ३५०० रुपये मिळावी, या प्रमुख मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने सोमवारी (दि. १६ नोव्हेंबर २०२६) रोजी सोलापुरात भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येणार आहे.

सोमवारी सकाळी ११ वाजता चार पुतळा, हुतात्मा चौक येथून मोर्चाला सुरुवात होणार आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पहिली उचल प्रतिटन ३५०० रुपये देण्यात यावी, अशी संघटनेची प्रमुख मागणी आहे. तसेच ऊस गाळप हंगाम संपल्यानंतर प्रतिटन १०० रुपये अतिरिक्त द्यावेत आणि साखरेचा दर पुढील वर्षभर ४५ च्या पुढे राहिल्यास पुढील हंगाम सुरू होण्यापूर्वी आणखी २०० रुपये द्यावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

संघटनेने कोल्हापूरमध्ये प्रतिटन ४२०० रुपये, तर कर्नाटकमध्ये ३६०० रुपये दर मिळत असल्याचा उल्लेख करत सोलापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना तुलनेने कमी दर का मिळत आहे, असा सवाल उपस्थित केला आहे. साखरेचा दर ३४०० रुपये असताना उसाला ३००० रुपये मिळत होते आणि सध्या साखरेचा दर ५००० रुपये असतानाही उसाला ३००० रुपयेच का, असा प्रश्न संघटनेने उपस्थित केला आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटना, सोलापूर जिल्हा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

'ऊसाला पहिली उचल ३५०० रुपये घेतल्याशिवाय राहणार नाही,' असा निर्धार व्यक्त करत संघटनेने शेतकऱ्यांना मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

— YALLAPPA RAGATE (PATIL)

धर्म

गाणगापूरमध्ये दत्त महाराजांच्या दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी



गाणगापूर | प्रतिनिधी

कर्नाटकातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र गाणगापूर येथे श्री दत्त महाराजांच्या दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी उसळली आहे.

पहाटेपासूनच मंदिर परिसरात महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा यासह देशभरातून आलेल्या भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मंदिराच्या उंच, रंगीबेरंगी आणि आकर्षक गोपुरासमोर हात जोडून, डोके टेकवून दर्शन घेताना भाविकांचे डोळे पाणावलेले दिसत होते.

मंदिराच्या आतील गाभाऱ्यासमोरही दर्शनासाठी भाविकांची मोठी रांग लागली होती. फुलांच्या माळा, झेंडूच्या तोरणांनी सजवलेल्या मंदिरात घंटानाद, भजन आणि दत्त नामाचा गजर सुरू होता. संपूर्ण गाणगापूर नगरी 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' या जयघोषाने दुमदुमून गेली आहे.

गुरुचरित्र पारायण, पादुका दर्शन, भिक्षा, संगम स्नान आणि माधुकरीसाठी आलेल्या भाविकांमुळे गावात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक भाविकांनी नवस फेडण्यासाठी, कुटुंबासह दर्शन घेण्यासाठी गाणगापूरला हजेरी लावली.

"इथे आलं की मनाला वेगळीच शांती मिळते. दत्त महाराजांच्या पादुकांचं दर्शन झालं की सगळा थकवा निघून जातो," अशी भावना एका भाविकाने व्यक्त केली.

दर्शनासाठी आलेल्या भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून मंदिर प्रशासनाकडून योग्य नियोजन करण्यात आले आहे.

-

— रीपोर्टर दिलीप नगरे

ओतुर मार्केटमध्ये दिवाळी नंतर कांद्याची चांगली आवक बाजारभाव किंचीत उ



जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समिती उपबाजारावर बाजार आवार ओतूर या ठिकाणी कांद्याची चांगली आवक झाली.सुमारे 22हजार पिशव्यांची आवक झाली दिवाळी नंतर मार्केट सुरू झाली बाजारभाव तिची पाहायला मिळेल. बाजारभाव प्रतिदा किलो प्रमाणे गोळा कांदा 460ते500. सुपर कांदा 400ते461. गोलटीकांदा300ते400 . बदला कांदा 100ते300 असं बाजार भाव मिळाला तसेच बटाटा 50ते211 आवक 48पिशवी. लसुण 800ते1200 आवक 5पिशवी दिवाळीनंतर बाजारभाव वाढल्यामुळे

शेतकरी आनंद व्यक्त करत आहे. अशी माहिती बाजार समितीचे सभापती श्री संजयराव काळे व सचिव श्री रुपेश कवडे व कार्यालय प्रमुख श्री दीपक मस्करे साहेब यांनी दिली.

— Ashok durgude, पुणे

नांदणीत १३ व १४ नोव्हेंबर रोजी बिरलिंगेश्वर-महालिंगेश्वर यात्रा महोत्सवाचे आयोजन



नांदणीत १३ व १४ नोव्हेंबर रोजी बिरलिंगेश्वर-महालिंगेश्वर यात्रा महोत्सवाचे आयोजन

नांदणी : दक्षिण सोलापूर तालुक्यातील नांदणी येथे श्री बिरलिंगेश्वर व श्री महालिंगेश्वर यांच्या यात्रेनिमित्त शुक्रवार दि. १३ व शनिवार दि. १४ नोव्हेंबर २०२६ रोजी भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा यात्रेचे दहावे वर्ष असून, यानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.

शुक्रवारी सकाळी १० वाजता गंगास्थळाचा कार्यक्रम होणार असून, सायंकाळी ४ वाजता श्री बिरलिंगेश्वर व श्री महालिंगेश्वर पालख्यांसह विजापूर फुलांचे आगमन होणार आहे. सायंकाळी ६ वाजता बाहेरील सर्व पालख्यांचे आगमन होईल.

शुक्रवारी रात्री १० वाजता बिरलिंगेश्वर गायन संघ, कारकल (ता. दक्षिण सोलापूर) आणि श्री अप्पासिद्ध गायन संघ, गुणकी (जि. विजापूर) यांचा गायनाचा कार्यक्रम होणार आहे. यामध्ये मुख्य गायक कांचना कारकल व अभिषेक गुणकी हे आपली कला सादर करणार आहेत.

शनिवारी सकाळी अभिषेक सोहळा, त्यानंतर केदारलिंगेश्वर बाल संघ, यमकानूर (ता. आळंद, जि. विजापूर) तसेच दुर्गा देवी गोविंद कुणिता कला संघ, सारवाड (ता. यडरामे) यांचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

शनिवारी सायंकाळी ५ वाजता सर्व पालख्यांचा जंगी भेट कार्यक्रम होणार असून, रात्री ७ वाजता चित्र-विचित्र शोभेचे दारूकाम आयोजित करण्यात आले आहे.

यात्रेत श्री बिरलिंगेश्वर पालखी, श्री महालिंगेश्वर पालखी (नांदणी), श्री रेणुकासिद्ध पालखी (डोळकणी), श्री ब्रह्मदेव पालखी (चिंचपूर), श्री धुळी महाकालेश्वर पालखी (शिंगणगाव), श्री लामगव्वा देवी पालखी (लवंगी) आणि श्री जेटिंगराया पालखी (विनायकनगर) सहभागी होणार आहेत.

यात्रेनिमित्त १३ व १४ नोव्हेंबर रोजी दिवसभर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. या धार्मिक व सांस्कृतिक सोहळ्याचा परिसरातील भाविकांनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळी, नांदणी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

— YALLAPPA RAGATE (PATIL)

लोकप्रबोधन सोहळा !



भाऊबीजेनिमित्त भव्य सांस्कृतिक लोकप्रबोधन सोहळा !

सरकोली, पंढरपूर

भाऊबीजेच्या निमित्ताने पंढरपूर तालुक्यातील सरकोली येथे गावातील माताभगिनी आणि नागरिकांसाठी भव्य सांस्कृतिक लोकप्रबोधन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक श्री. नागराज मंजुळे हेही उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे या सांस्कृतिक कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

आपल्या घरासाठी आणि कुटुंबासाठी महिला वर्षभर मनापासून कष्ट घेत असतात. विशेषतः दिवाळीसारख्या सणांच्या काळात घराची स्वच्छता, फराळाची तयारी, पाहुण्यांचे स्वागत अशा अनेक जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांची मोठी धावपळ होते. या सगळ्यात त्यांना स्वतःसाठी निवांत वेळ मिळणेही कठीण असते. त्यामुळे भाऊबीजेच्या निमित्ताने आपल्या माताभगिनींना थोडा विरंगुळा मिळावा, त्यांना मनोरंजनाचा आनंद घेता यावा आणि त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलावे, या उद्देशाने अशा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे ही खरोखरच कौतुकास्पद बाब आहे. लोककलेच्या माध्यमातून मनोरंजनासोबतच समाजप्रबोधनाचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला.

या कार्यक्रमाला पंढरपूर मंगळवेढा तालुक्याचे आमदार समाधान आवताडे, मोहोळ मतदार संघाचे आमदार राजू खरे उपस्थित होते. याप्रसंगी या सुंदर उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल श्री. दत्ताभाऊ भोसले मित्र परिवार तसेच श्री भैरवनाथ ग्रामविकास समविचारी आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांचे मनापासून आभार मानले. सरकोलीकरांनी या सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

#Pandharpur #Folk_प्रबोधन #NagrajManjule #सांस्कृतिक #SocialWork

— Suhas Tagare

वळसंग येथे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या भव्य भूमिपूजन सोहळ्याला उत्साहात प्रारंभ



वळसंग येथे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या भव्य भूमिपूजन सोहळ्याला उत्साहात प्रारंभ

आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या शुभहस्ते भूमिपूजन; रामप्पा सावकार चिवडशेट्टी बलवान साहेब गोतसुरे यांची प्रमुख उपस्थिती

वळसंग : वळसंग येथे श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीच्या वतीने श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या भव्य भूमिपूजन समारंभाचे आयोजन करण्यात आले. या मंगलमय धार्मिक सोहळ्याचे भूमिपूजन आमदार मा. श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी परिसरात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या उभारणीच्या या महत्त्वपूर्ण कार्यामुळे भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. मंदिर हे केवळ श्रद्धेचे स्थान नसून सामाजिक आणि धार्मिक एकतेचे केंद्र असते. त्यामुळे या मंदिराच्या उभारणीच्या कार्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या शुभप्रसंगी आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्यासह रामप्पा सावकार चिवडशेट्टी बलवान साहेब गोतसुरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या उपस्थितीत धार्मिक विधी पार पडले आणि मंदिर उभारणीच्या कार्याचा शुभारंभ करण्यात आला. आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यामुळे वळसंग परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या मंदिराच्या माध्यमातून भविष्यात धार्मिक कार्यक्रम, उत्सव आणि भक्तिमय उपक्रमांना अधिक चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

या मंगलमय भूमिपूजन सोहळ्यामुळे वळसंगच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवात आणखी एक महत्त्वपूर्ण भर पडली आहे.

— YALLAPPA RAGATE (PATIL)

सोलापुरात १४ नोव्हेंबर रोजी ‘स्नेहा गौरी लाईव्ह ऑर्केस्ट्रा’चे आयोजन



सोलापुरात १४ नोव्हेंबर रोजी ‘स्नेहा गौरी लाईव्ह ऑर्केस्ट्रा’चे आयोजन

सोलापूर : संगीतप्रेमी रसिकांसाठी सोलापुरात ‘स्नेहा गौरी लाईव्ह ऑर्केस्ट्रा’ या विशेष संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध संगीतकार डॉ. जब्बार यांच्या ‘स्टार्स ऑफ मेलोडीज’सह प्रभाकर सलगर आणि राजू गायकवाड प्रस्तुत या कार्यक्रमात सुरेल गीतांची मेजवानी रसिकांना अनुभवायला मिळणार आहे.

या कार्यक्रमात जुन्या व नव्या लोकप्रिय गीतांसह सुरेल संगीताची मैफल रंगणार असून, संगीतप्रेमी प्रेक्षकांसाठी जल्लोषपूर्ण आणि मनोरंजक कार्यक्रमाची तयारी करण्यात आली आहे.

‘तुने ही सजाये है मेरे होठों पे ये गीत’ या सुरेल गीताच्या भावनेतून सजणाऱ्या या संगीत संध्येत रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कलाकारांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम शनिवार, दिनांक १४ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

— YALLAPPA RAGATE (PATIL)

स्थानीय

पुण्याच्या भोरमधील श्री क्षेत्र बनेश्वर मंदिरात दिवाळी पहाट कार्यक्रम



भोर, पुणे – दिवाळीच्या पहाटे श्री क्षेत्र बनेश्वर मंदिर परिसरात आयोजित झालेल्या दिवाळी पहाट कार्यक्रमात नसरापूर सांस्कृतिक कट्टा व बनेश्वर देवस्थान ट्रस्ट यांनी संगीतमय स्वरमैफली सादर केली. कार्यक्रमाची सुरुवात मंदिराच्या पवित्र वातावरणात झाली आणि स्थानिक रहिवाशांच्या उत्साही उपस्थितीने भरलेला होता.

या स्वरमैफलीत विविध गायकांनी हिंदी-मराठी चित्रपटांतील लोकप्रिय गाणी, शास्त्रीय संगीत, भावगीते व बालप्रतिपदेची गाणी सादर केली. गाण्यांच्या मधुर स्वरांनी कार्यक्रमाला एक विशेष आकर्षण दिले आणि उपस्थितांमध्ये उत्सवाची भावना वाढवली.

संगीतकारांनी शास्त्रीय रागांपासून आधुनिक चित्रपट गाण्यांपर्यंत विविध शैलींचा समावेश करून सर्व वयोगटातील प्रेक्षकांचे लक्ष वेधले. विशेषतः बालप्रतिपदेची गाणी लहान मुलांच्या उत्साहाने भरलेली होती, ज्यामुळे कार्यक्रमात आनंदाची लहर पसरली.

सार्वजनिक प्रतिसाद उत्स्फूर्त होता; नागरिकांनी कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवून दिवाळीचा आनंद द्विगुणित केला. या प्रकारचा सांस्कृतिक कार्यक्रम स्थानिक समुदायात सणासुदीच्या काळात एकत्रितपणे आनंद साजरा करण्याची संधी प्रदान करतो.

— किरण सदाशिव आंबिके

पाले गावातील तरुणाने दुर्ग रोहिडा किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती साकारली



दिवाळीच्या निमित्ताने पुणे जिल्ह्याच्या भोर तालुकेतील पाले गावात तरुण रिपिक सपकाळ यांनी दुर्ग रोहिडा किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती उभी केली, जी स्थानिक लोकांच्या उत्सुकतेला कारणीभूत ठरली.

या प्रतिकृतीत किल्ल्याच्या लढायांचे बारकावे कलात्मक पद्धतीने मांडले असून, छत्रपती शिवरायांच्या शौर्याची अनोखी मानवंदना दर्शविली आहे.

प्रतिकृती तयार करण्यासाठी माती, दगड आणि हिरवळीचे स्वरूप दर्शविण्यासाठी रांगोळीचा सर्जनशील वापर करण्यात आला, ज्यामुळे इतिहासाची जिवंत प्रतिमा निर्माण झाली.

या उपक्रमाद्वारे ऐतिहासिक वारसा जपण्याचा आणि गडसंवर्धनाचा संदेश दिला गेला आहे; परिसरातील नागरिकही प्रतिकृती पाहण्यासाठी गर्दीने आले आहेत.

— किरण सदाशिव आंबिके

राजनीति

मुख्यमंत्री फडणवीस यांनी नवी मुंबई विमानतळाकडे १४ आंतरराष्ट्रीय उड्डाण मार्ग हलवण्यास विरोध केला



मुंबई विमानतळावरून १४ आंतरराष्ट्रीय उड्डाण मार्ग नवी मुंबई विमानतळाकडे हलवण्याच्या प्रस्तावावर चर्चा सुरू आहे.

या प्रस्तावानुसार मुंबईतील आंतरराष्ट्रीय उड्डाणांची संख्या नवी मुंबई विमानतळावर स्थानांतरित करण्याचा विचार करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रस्तावास विरोध दर्शवला असून त्यांनी या बदलासंबंधी आपली चिंता व्यक्त केली आहे.

सध्या या विषयावर पुढील चर्चा आणि निर्णय प्रक्रियेची वाट पाहिली जात आहे.

— YALLAPPA RAGATE (PATIL), मुंबई

शिक्षा

पुण्यातील सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीची आता केंद्रीय तपास यंत्रणांकडून चौकशी होणार



पुण्यातील सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीची आता केंद्रीय तपास यंत्रणांकडून चौकशी होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाने संस्थेची CBI आणि ED मार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. संस्थेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आठ वर्षांपासून वेतन थकीत असून, ही देणी 400 कोटी रुपयांहून अधिक असल्याचे याचिकांमध्ये नमूद करण्यात आले आहे. यापूर्वी वेतन थकबाकी आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान यामुळे संस्थेच्या 10 शाळांची मान्यता रद्द करण्याचे आदेशही देण्यात आले होते.

#SinhgadInstitute #PuneNews #CBI #ED #BombayHighCourt #EducationNews

Sinhgad Technical Education Society, Pune, CBI Investigation, ED Investigation

— Suhas Tagare, पुणे

काल पाडव्याच्या मुहूर्तावर अतुल शास्त्री भगरे गुरुजी भागवत कथाकार यांनी विठ्ठलाचे दर्शन घेऊन माऊली पंचांग उद्घाटन केले



काल पाडव्याचा मुहूर्त अतिशय महत्वाचा.. आपल्या सर्वांच्या शुभेच्छानी पंढरपूर येथे पांडुरंगाच्या समोर संत सतपुरुष जगद्गुरू व विद्वानांच्या सानिध्यात माऊली पंचांग.. अतुलनीय दिनदर्शिका.. व धर्मशास्त्रीय निर्णय याचे प्रकाशन झाले ..

यावेळी प पू. अंमळनेरकर महाराज.. पदमश्री वेदालंकार श्री गणेश्वरशास्त्री... जगद्गुरू शन्कराचार्य... अमृताश्रम स्वामी... गुरुवर्य चंद्रशेखर महाराज व सद्गुरू चैतन्य महाराज... तसेच अनेक वैदिक व ज्योतिष शास्त्रातील मान्यवर उपस्थित होते

— Suhas Tagare

राजनीति

राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत मुख्यमंत्र्यांचे सूचक वक्तव्य



राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाचा निर्णय घेतलाच, तर आमच्याशी चर्चा करूनच तो अंतिम केला जाईल’, असे सूचक विधान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांच्या या विधानाला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. दरम्यान, तीन पक्षांचे सरकार चालविताना समन्वय आणि संवाद महत्त्वाचा असल्याचे सांगत त्यांनी महायुतीतील सहकार्याचे महत्त्वही अधोरेखित केले.

— Suhas Tagare, मुंबई

अपराध

सावध रहा! डिजिटल व्यवहारात सायबर फसवणुकीपासून बचाव करण्याचे मार्ग



मोबाईल, सोशल मीडिया आणि ऑनलाइन व्यवहारांच्या वाढत्या वापरामुळे नागरिकांनी सायबर सुरक्षेबाबत जागरूक होणे काळाची गरज आहे. आजच्या डिजिटल युगात मोबाईल बँकिंग, UPI पेमेंट, सोशल मीडिया, ऑनलाइन खरेदी आणि इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे, परंतु याच डिजिटल सुविधांचा गैरवापर करून सायबर गुन्हेगार नागरिकांची आर्थिक फसवणूक करत असल्याच्या घटना समोर येत आहेत.

बनावट बँक कॉल, KYC अपडेटच्या नावाखाली पाठवलेले संदेश, अनोळखी लिंक, बनावट नोकरीच्या जाहिराती, सोशल मीडिया अकाउंट हॅकिंग, OTP मागून होणारी फसवणूक तसेच डिजिटल अटक (Digital Arrest) अशा विविध पद्धतींनी नागरिकांना लक्ष्य केले जात आहे. या सर्व पद्धतींमध्ये अनोळखी व्यक्तींना OTP, UPI PIN किंवा पासवर्ड सांगणे, अनोळखी लिंकवर क्लिक करणे, बँक किंवा सरकारी अधिकारी असल्याचे सांगणाऱ्या अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवणे, स्क्रीन शेअरिंग किंवा रिमोट ॲक्सेस ॲप अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावरून इन्स्टॉल करणे यांचा समावेश

मजबूत पासवर्ड आणि टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन वापरावे, ऑनलाइन आर्थिक व्यवहार करताना खात्री करूनच पैसे पाठवावे, आणि डिजिटल अटक ही कायदेशीर अटकेची अधिकृत प्रक्रिया नाही, अशा नावाने धमकावणाऱ्यांपासून सावध राहावे. तसेच सोशल मीडिया अकाउंटसाठी सुरक्षितता वाढवण्यासाठी नियमितपणे पासवर्ड बदलणे आणि शंका असल्यास त्वरित बदलणे आवश्यक आहे.

फसवणूक झाल्यास तातडीने राष्ट्रीय सायबर गुन्हे हेल्पलाइन क्रमांक 1930 वर संपर्क साधावा आणि अधिकृत सायबर क्राइम पोर्टल cybercrime.gov.in वर तक्रार नोंदवावी. नागरिकांनी स्वतः जागरूक राहण्याबरोबरच आपल्या कुटुंबातील सदस्यांना आणि परिसरातील इतर नागरिकांनाही डिजिटल फसवणुकीच्या पद्धतींबाबत माहिती द्यावी. एक छोटीशी चूक आर्थिक नुकसान घडवू शकते; मात्र थोडीशी सतर्कता मोठी फसवणूक टाळू शकते.

— Prashant Pradhan, मुंबई

स्थानीय

आसामच्या भाईफोट्याच्या सकाळी कोलकाता-सैरांग एक्स्प्रेसचे ७ डबे रुळावरून घसरले, अनेक प्रवासी जखमी



आसामच्या भाईफोट्याच्या सकाळी कोलकाता-सैरांग एक्स्प्रेसच्या सात डब्यांचे रुळावरून घसरल्याची मोठी रेल्वे दुर्घटना घडली. या अपघातात अनेक प्रवासी जखमी झाले, ज्यामुळे स्थानिक अधिकाऱ्यांची त्वरित कारवाई आवश्यक ठरली.

घटनेनंतर त्वरित बचाव दल आणि रेल्वे कर्मचाऱ्यांनी जखमी प्रवाशांना प्राथमिक उपचार दिले आणि जखमी व्यक्तींची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिली. रुळावरील बिघडलेली डबे हटविण्यासाठी तांत्रिक टीमने काम सुरू केले.

या अपघातामुळे रेल्वे मार्गावर तात्पुरती अडथळा निर्माण झाला, परंतु अधिकाऱ्यांनी प्रवासी वाहतूक पुन्हा सुरू करण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या आहेत. दुर्घटनेच्या कारणांची तपासणी सुरू असून, भविष्यात अशा प्रकारच्या घटनांना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जाणार आहेत.

— DOCTOR PINTU PAUL

बोलबच्चन चेअरमन अभिजीत पाटील! किरणराज घोडके यांना जोडावे. #kiranrajghodake #pandharpur #viral #abhijeetpatil #farmer



बोलबच्चन चेअरमन अभिजीत पाटील!

किरणराज घोडके यांना जोडावे.

#kiranrajghodake #pandharpur #viral #abhijeetpatil #farmer

— Suhas Tagare

उभं केलं; लेकाच्या वाट्याला मात्र दोनदा उपेक्षा -.राजकारण लई वंगाळ



"बापाने रक्ताचं पाणी करून गोकुळ उभं केलं; लेकाच्या वाट्याला मात्र दोनदा उपेक्षा -.राजकारण लई वंगाळ

गोकुळच्या चेअरमनपदाची दोनदा निर्माण झालेली आशा, ऐनवेळी बदललेली राजकीय समीकरणं आणि शशिकांतदादा चुयेकर यांच्या वाट्याला आलेला अपेक्षाभंग; राजकारणात निष्ठा, शब्द आणि योगदान यांची किंमत नेमकी किती?

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचं एक वाक्य राजकारणाचं वास्तव अधोरेखित करतं, ते म्हणजे, "राजकारण लई वंगाळ असतंय!" राजकारणातील सत्तासंघर्ष, कुरघोड्या, आश्वासनं, शब्द फिरवणं आणि ऐनवेळी बदलणारी समीकरणं पाहिली की या वाक्याची प्रचिती येते. मात्र राजकारणाचा खरा क्रूर चेहरा तेव्हा समोर येतो, जेव्हा सत्तेच्या गणितात एखाद्या व्यक्तीची वर्षानुवर्षांची निष्ठा, त्याग आणि योगदान बाजूला सारलं जातं. गोकुळ दूध संघाच्या चेअरमनपदाच्या निवडीच्या निमित्ताने शशिकांत आनंदराव पाटील चुयेकर यांच्या संदर्भात उपस्थित झालेला प्रश्न असाच अस्वस्थ करणारा आहे.

गोकुळ ही केवळ दूध उत्पादकांची संस्था नाही, तर कोल्हापूरच्या सहकार चळवळीचा मानबिंदू आहे. या संस्थेच्या उभारणीत अनेकांनी आयुष्य वेचलं. त्यामध्ये स्वर्गीय आनंदराव पाटील चुयेकर यांचं योगदान महत्त्वाचं राहिलं आहे. ज्या संस्थेला उभं करण्यासाठी वडिलांनी आयुष्यभर कष्ट घेतले, त्याच संस्थेच्या सर्वोच्च पदावर त्यांच्या मुलाला काम करण्याची संधी मिळावी, अशी अपेक्षा निर्माण होणं स्वाभाविक आहे. मात्र राजकारणात वारसा, योगदान आणि अपेक्षा यापेक्षा सत्तेची गणितं मोठी ठरतात, हे पुन्हा एकदा दिसून आलं.

यापूर्वी सतेज पाटील आणि हसन मुश्रीफ एकत्र असताना गोकुळच्या चेअरमनपदाच्या शेवटच्या वर्षात शशिकांतदादा चुयेकर यांना संधी मिळणार असल्याची चर्चा होती. त्यांच्या नावाची अपेक्षा निर्माण झाली होती. मात्र ऐनवेळी राजकीय समीकरणं बदलली आणि ही संधी हुकली. त्या वेळी त्यांनी पक्षाची आणि नेतृत्वाची भूमिका स्वीकारत संयम राखला. कोणताही मोठा राजकीय संघर्ष उभा न करता ते पुन्हा संघटनेच्या कामात सक्रिय राहिले.

यंदाच्या निवडणुकीत पुन्हा एकदा आशा निर्माण झाली. निवडणुकीपूर्वी चेअरमनपदाबाबत नेतृत्वाकडून शब्द दिला गेल्याची चर्चा होती. कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली. २५ पैकी १३ संचालक निवडून आणण्यात यश मिळालं. विजयाचा जल्लोष झाला आणि आता तरी शशिकांतदादा चुयेकर यांना संधी मिळेल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली. मात्र चेअरमनपदाच्या निवडीच्या अंतिम टप्प्यात नावांमध्ये बदल झाल्याने पुन्हा एकदा त्यांच्या संधीवर प्रश्नचिन्ह निर्माण झालं.

इथे प्रश्न केवळ एका व्यक्तीला पद मिळालं किंवा मिळालं नाही, एवढाच नाही. प्रश्न आहे तो नेतृत्वाने दिलेल्या शब्दाचा, कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा आणि राजकीय निष्ठेच्या मूल्यमापनाचा! निवडणुकीच्या काळात कार्यकर्त्यांकडून जीवाचं रान करून घेतलं जातं. विजयासाठी त्यांची ताकद वापरली जाते. मात्र सत्तेची पदं वाटण्याची वेळ आली की त्याच कार्यकर्त्यांच्या अपेक्षा बाजूला पडत असतील, तर संघटनेतील निष्ठेचा अर्थ तरी काय उरतो?

शशिकांतदादा चुयेकर यांच्या छायाचित्रातील शांत चेहरा अनेक प्रश्न उपस्थित करतो. त्यांच्या मनात नेमकं काय सुरू आहे, हे तेच सांगू शकतील; मात्र दोन वेळा निर्माण झालेली आशा आणि त्यानंतर बदललेली राजकीय परिस्थिती हा निश्चितच विचार करण्यासारखा विषय आहे. एखाद्या व्यक्तीच्या योगदानाचा आणि संयमाचा विचार राजकीय निर्णय घेताना होणार नसेल, तर उद्या सामान्य कार्यकर्त्यांनी नेतृत्वावर विश्वास तरी कसा ठेवायचा? विषय नाही. लाखो दूध उत्पादकांच्या कष्टांशी या संस्थेचं नातं आहे. त्यामुळे चेअरमनपदाच्या निवडीत राजकीय समीकरणांबरोबरच संस्थेचा इतिहास, योगदान आणि भविष्यातील हित यांचाही विचार होणं अपेक्षित आहे.

अखेर सत्ता येते आणि जाते, पदं बदलतात, राजकीय समीकरणंही बदलतात; पण माणसाने जपलेली निष्ठा आणि दिलेल्या शब्दाची किंमत कायम राहते. म्हणूनच आजचा प्रश्न शशिकांतदादा चुयेकर यांच्यापुरता मर्यादित नाही. तो प्रत्येक निष्ठावान कार्यकर्त्याचा आहे.

कारण राजकारणात विजय मिळवण्यासाठी कार्यकर्त्यांची गरज असते; पण त्या कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा विजय मिळवण्यासाठी नेतृत्वाकडे शब्द पाळण्याची हिंमतही असावी लागते. अन्यथा अजितदादांचं एक वाक्य पुन्हा पुन्हा आठवत राहतं... "राजकारण लई वंगाळ असतंय

#ShashikantPatilChuyekar #Gokul #GokulDairy #GokulPolitics #KolhapurPolitics #SatejPatil #HasanMushrif #MaharashtraPolitics #PoliticalEditorial #PoliticalNews #CooperativeMovement #Kolhapur #राजकारणलईवंगाळ #शशिकांतदादाचुयेकर #गोकुळ #कोल्हापूर

— Suhas Tagare

अक्कलकोट मध्ये दिवाळी सणानिमित भाविकांची स्वामी समर्थ दर्शनासाठी गर्दी



अक्कलकोट मध्ये दिवाळी सणानिमित भाविकांची स्वामी समर्थ दर्शनासाठी गर्दी

— Suhas Tagare

खळबळ! भाजपचे स्वीकृत नगरसेवक अमोल गुडेल्लीवार यांना १ लाख २० हजार रुपयांची लाच घेताना ACB ने पकडल्याचा आरोप!



खळबळ! भाजपचे स्वीकृत नगरसेवक अमोल गुडेल्लीवार यांना १ लाख २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना ACB ने पकडल्याचा आरोप!

अहेरी / गडचिरोली : अहेरी नगरपंचायतीतील विजेच्या कामांच्या ठेक्याच्या मोबदल्यात कमिशन मागितल्याच्या कथित प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. भाजपचे स्वीकृत नगरसेवक अमोल गुडेल्लीवार यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाच्या (ACB) पथकाने अहेरीच्या मुख्य बाजारपेठेत १ लाख २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडल्याचा दावा समोर आला आहे.

ठेकेदाराच्या तक्रारीनंतर ACB चा सापळा

मिळालेल्या माहितीनुसार, अहेरी नगरपंचायतीच्या विजेच्या कामांच्या ठेक्याच्या संदर्भात संबंधित ठेकेदाराकडे १ लाख २० हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. या मागणीला विरोध करत ठेकेदाराने थेट गोंदिया येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीनंतर ACB अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी करून सापळा रचला. गुरुवारी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास अहेरीच्या मुख्य बाजारपेठेत लाचेची रक्कम स्वीकारताना अमोल गुडेल्लीवार यांना ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात येत असून, ACB उपअधीक्षक विक्रांत सगणे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास व कायदेशीर कारवाई सुरू असल्याची माहिती आहे.

निवडणुकीतील पराभवानंतर स्वीकृत नगरसेवकपद; राजकीय चर्चेला उधाण

अमोल गुडेल्लीवार हे नगरपंचायत निवडणुकीत पराभूत झाले होते. मात्र, त्यानंतर भाजपकडून त्यांची स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्ती करण्यात आल्याचा दावा केला जात आहे. तसेच ते माजी राज्यमंत्री अम्बरीशराव आत्राम यांचे निकटवर्तीय समर्थक असल्याचीही राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

या कथित लाचखोरीच्या प्रकरणामुळे स्थानिक राजकारणात चर्चेला उधाण आले असून, लोकप्रतिनिधींच्या जबाबदारीबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

विकासकामांतील कमिशनखोरीला आळा कधी?

या घटनेच्या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांकडून काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

- विकासकामांच्या ठेक्यांमध्ये कमिशनखोरीचे प्रकार कितपत वाढले आहेत?

- जनतेच्या पैशातून होणाऱ्या विकासकामांमध्ये पारदर्शकता कधी येणार?

- या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का?

- संबंधित ठेक्यांची आणि आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी होणार का?

पारदर्शक कारभार आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासन ही जनतेची अपेक्षा आहे. त्यामुळे या प्रकरणाचा निष्पक्ष तपास करून दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई होणे आवश्यक आहे.

टीप : सदर प्रकरण तपासाधीन असून, अमोल गुडेल्लीवार यांच्यावरील आरोपांची न्यायालयात अद्याप दोषसिद्धी झालेली नाही. अंतिम निर्णय होईपर्यंत त्यांना निर्दोषत्वाचा कायदेशीर लाभ लागू राहील.

— DOCTOR PINTU PAUL

राजनीति

नेते एकत्र, जनता मात्र विभागलेली



नेते एकत्र, जनता मात्र विभागलेली!

राजकारणी एकमेकांवर टीका करतात, आरोप करतात, विरोधात बोलतात; पण वेळ आली की एकमेकांच्या घरी जातात, सुख-दुःखात सहभागी होतात आणि आपले संबंधही जपतात.

मात्र आपण सामान्य माणसं काय करतो? त्यांच्या राजकारणाला आपली प्रतिष्ठा समजतो. त्यांच्या समर्थनासाठी आपल्याच मित्रांशी, नातेवाईकांशी भांडतो, शिवीगाळ करतो, मारामारी करतो आणि प्रसंगी दंगलीही घडवतो.

ज्यांच्यासाठी आपण एकमेकांचे शत्रू बनतो, ते मात्र आपापले संबंध सांभाळून असतात. मग एकदा स्वतःलाच प्रश्न विचारा, ज्यांच्यासाठी आपण आपली माणसं गमावतो, ते आपल्यासाठी काय गमावतात?

राजकारण करा, आपल्या विचारधारेशी प्रामाणिक राहा; पण कोणत्याही नेत्यासाठी माणुसकी आणि आपली नाती गमावू नका. कारण नेते कधीच कायमचे विरोधक नसतात, पण त्यांच्या राजकारणामुळे सामान्य माणसं कायमची एकमेकांपासून दुरावतात

— Ashok Patil

भाभा अणु संशोधन केंद्राने मुंबईत वैज्ञानिक सहाय्यक (रेडिओग्राफर) पदासाठी भरती जाहीर केली



भाभा अणु संशोधन केंद्र (BARC), मुंबईने वैज्ञानिक सहाय्यक (रेडिओग्राफर) या पदासाठी भरतीची घोषणा केली आहे. या पदासाठी इच्छुक उमेदवारांना अर्ज करण्यास सांगितले आहे.

BARC हे भारतातील प्रमुख अणु संशोधन संस्था असून, विविध वैज्ञानिक संशोधन प्रकल्पांमध्ये कार्यरत आहे. या भरतीमुळे केंद्राच्या रेडिओग्राफिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नवीन तज्ञांची भर पडेल.

भाभा अणु संशोधन केंद्र (BARC), मुंबई यांनी 'वैज्ञानिक सहाय्यक (रेडिओग्राफर)' (Scientific Assistant / Radiographer) पदासाठी लोकम (Locum) तत्त्वावर भरती जाहीर केली आहे. याबद्दलची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे आहे:

पदाचे नाव: वैज्ञानिक सहाय्यक / रेडिओग्राफर (Scientific Assistant - Radiographer)

नोकरीचे ठिकाण: BARC रुग्णालय, अणुशक्तीनगर, मुंबई

वेतन: ₹१९,५०२ ते ₹४५,००० प्रति महिना (पदानुसार / नियमानुसार)

मुलाखतीची तारीख: १६ नोव्हेंबर २०२६.

— Ramesh Sukhdev Khandagale, मुंबई

मनोरंजन

महाराष्ट्राच्या लोककलेचा जागर! रामदास राऊत यांच्या 'राया मला पळून न्या की राव' लावणीला रसिकांची पसंती!



महाराष्ट्राच्या लोककलेचा जागर! रामदास राऊत यांच्या 'राया मला पळून न्या की राव' लावणीला रसिकांची पसंती!

पुणे प्रतिनिधी |11 नोव्हेंबर 2026

महाराष्ट्राच्या पारंपरिक लोककलेचा वारसा जपण्याचे कार्य पारनेर तालुक्यातील म्हसे खुर्द येथील निर्माते रामदास राऊत सर करीत आहेत. त्यांच्या 'तृप्ती फिल्म प्रोडक्शन' निर्मित 'राया मला पळून न्या की राव' या अस्सल मराठी लावणीचे नुकतेच युट्यूबवर प्रदर्शन झाले आहे.

या लावणीचे गीतलेखन रामदास राऊत यांनी केले असून गणेश अस्वार यांनी संगीत दिले आहे. सुप्रसिद्ध गायिका राखी चौरे यांनी आपल्या सुमधुर आवाजात गायन केले आहे. शुभांजली थोरात यांच्या ठसकेबाज नृत्याने लावणीला विशेष रंगत आणली आहे.

तसेच अलकाताई महाजन, ज्योती देशमुख व आरती जगताप यांचे कोरस, हार्मोनियमवर राजेंद्र ताम्हणे आणि ढोलकीवर किसन साळवे (आमदाबादकर) व अमोल गायकवाड यांनी साथ दिली आहे. भक्ती स्टुडिओ, बेल्हे येथे ध्वनिमुद्रण करण्यात आले असून अविष्कार विश्वासराव यांनी तांत्रिक कामकाज सांभाळले आहे.

ग्रामीण भागातील कलावंतांना व्यासपीठ मिळवून देतानाच महाराष्ट्राची पारंपरिक लावणी डिजिटल माध्यमातून रसिकांपर्यंत पोहोचविण्याचा रामदास राऊत यांचा हा प्रयत्न कौतुकास्पद आहे. रसिकांनी 'तृप्ती फिल्म प्रोडक्शन'च्या युट्यूब चॅनेलवर ही लावणी पाहून लाईक, शेअर व सबस्क्राईब करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शब्दांकन : श्री. सोमनाथ शिंदे, पुणे

— Anil Mallav, पुणे

वर्धा जिल्ह्यात महिला व बालकल्याण विभागात ₹70.51 लाख वेतन घोटाळा: विभागप्रमुखांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न



वर्धा जिल्ह्यात महिला व बालकल्याण विभागात कनिष्ठ लिपिक व कनिष्ठ सहाय्यक पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याच्या वेतनात नियमबाह्य वाढ केल्याचा आरोप करण्यात आला असून, या प्रकरणात सुमारे ₹70,51,910 ची अनियमितता समोर आली आहे.

योजना प्रकल्प कार्यालयात प्रकल्प अधिकारी ज्योत्स्ना चव्हाण यांनी दिलेल्या लेखी तक्रारीवरून समुद्रपूर पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये या कर्मचाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणात वेतनवाढीचे आदेश देताना आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मंजुरीचे पालन झाले होते का, तसेच कोषागाराकडे देयके पाठविताना पडताळणी झाली होती का, हे तपासणे आवश्यक आहे. विभागप्रमुख व लेखा विभागाच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

जिल्हा परिषद प्रशासनाने स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी, ज्यात वेतन देयके, सेवा अभिलेख, मंजुरी आदेश, पीपीए व कोषागारातील नोंदींची तपासणी समाविष्ट असेल. इतर पंचायत समित्यांमध्येही अशाच अनियमितता झाल्या आहेत का, हेही पडताळले पाहिजे.

आढळले तर संबंधित सर्व जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी. या प्रकरणातील सत्य बाहेर येऊन दोषींवर योग्य कारवाई होईल का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

— DOCTOR PINTU PAUL